सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासा
वा विभाग

.02528/2223337

:- dycfdahanu@mahaforest.gov.in

डहाणू आगर रोड, पंचायत समिति, डहाणू कार्यालया शेजारी,
डहाणू, जि. पालघर, पिन कोड नं. ४०१ ६०१.

---

पत्र जा.क्र.ब/२०/जमिन/१५२० /सन २०२१-२२, डहाणू ४०१ ६०१, दिनांक १३ ऑक्टोबर, २०२१.

प्रति,

असोसिएट वाईस प्रेसिडेंट (PR),
गुजरात गॅस लिमिटेड,
९०१, ९ व माळा, अवदेश हाऊस,
श्री. गुरू गोविंद गुरूव्दारा समोर,
एस.जी. हायवे, अहमदाबाद- ३८० ०५४.

विषयः- वनजमिन पालघर.
वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत गुजरात गॅस लिमिटेड, अहमदाबाद यांना नैसर्गिक वायु वितरण नेटवर्क उभारणेकामी भूमिगत स्टील पाईपलाईन टाकण्याकरीता ०.१३२० हेक्टर वनक्षेत्र वळतेकरणाबाबत

संदर्भ:-१) शासन आदेश क्रमांक एफएलडी-२०२१/प्र.क्र.१३२/फ-१०,दिनांक २३/०७/२०२१.
२) या कार्यालयाचे जा.क्र.ब/२०/जमिन/१२७४, दिनांक १३/०८/२०२१.
३) उपव्यवस्थापक (ROU), गुजरात गॅस लिमिटेड, अहमदाबाद यांचे कडील पत्र.क्र.GGL/Angam SL/FCA/Per/Request/२०२१ दिनांक ०६/१०/२०२१.

विषयांकित प्रस्तावातर्गत ०.१३२० हेक्टर वनक्षेत्र वळते करण्यास शासनाचे संदर्भिय पत्र क्र. १ अन्वये काही अटींवर तत्वतः मान्यता प्रदान करण्यात आली आहे. या कार्यालयाकडील संदर्भ क्र. २ अन्वये निर्गमित केलेले आदेश रद्द करणेत येत असून खालीलप्रमाणे अटनिहाय पुर्तता करण्यात यावी.

१. प्रस्तावातर्गत वळते होणा-या ०.१३२० हेक्टर वनक्षेत्राच्या ९,३९,०००/- प्रती हेक्टर दराने नक्त वर्तमान मुल्याची (NPV) एकूण रक्कम रूपये १,२३,९४८/- चा भरणा e-portal (https://parivesh.nic.in) व्दारे Ad-Hoc CAMPA कडे करण्यात यावा.

२. सुप्रिम कोर्टाने नियुक्त केलेल्या एक्सपर्ट कमिटीचे शिफारशीप्रमाणे अधिकची नक्त वर्तमान मुल्याची (NPV) रक्कम भरणेस तयार असल्याबाबत बंधपत्र (under taking) देणे आवश्यक आहे.

३. प्रस्तावातर्गत वळते होणा-या क्षेत्राबाबत संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडून अनुसूचित जमाती व इतर पारंरिक वननिवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम २००८ अंतर्गत विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र सादर करावे.

तत्वतः मंजूरीच्या पत्रातील अट क्रमांक १, २, ५, ६, ७, ८, ९, ११, १२, १३, १४, १५, १६, १७, १८, १९, २० मध्ये नमुद केल्यानुसार कार्यवाही करण्यास प्रकल्प यंत्रणा तयार असल्याबाबतचे हमीपत्र. (under taking) या आवश्यक कागदपत्रांसह पुर्तता अहवाल या कार्यालयास सादर करावा. सोबत तत्वतः मंजूरीच्या पत्राची प्रत जोडली आहे.

सहपत्र:-वरीलप्रमाणे.

(वि.ज. भिसे)
उप वनसंरक्षक
डहाणू वनविभाग, डहाणू.

प्रतिलिपी:- मा. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे यांना माहितीस्तव सविनय सादर.